# द अहिल्यानगर

संपादक –प्रशांत पाटील शेळके

सन्मान जनसामान्यांचा



| वर्ष १ वे | अंक १०ला | मासिक | द.अहिल्यानगर | दिनांक:-२२/०३/२०२५ | MAHMAR/52841 | किंमत १० रु


## कृषीमंत्री कोकाटेंसह नाशिक जिल्हा बँकेच्या २५ माजी संचालकांना सहकार विभागाची नोटीस

अहिल्यानगर

राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह नाशिक जिल्हा बँकेच्या २५ माजी संचालक किंवा त्यांच्या वारसांना सहकार विभागाने नोटीस बजावली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ३४७ कोटींच्या कर्जवाटपात १८२ कोटींची अनियमितता झाल्याप्रकरणी ही नोटीस बजावण्यात आल्याचे बोलले जात आहे. यामुळे नाशिक जिल्ह्यातील (छरीहळज्ञ उ्ळीीीळलीं) विविध पक्षांच्या बड्या राजकीय नेत्यांची चांगलीच धावपळ उडाली आहे सहकार विभागाने बजावलेल्या नोटीसमध्ये कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, खासदार डॉ. शोभा बच्छाव, आमदार दिलीप बनकर, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार नरेंद्र दराडे या विद्यमान लोकप्रतिनिधींचा समावेश आहे. कलम ८८ अंतर्गत अडीच वर्षाची चौकशी केल्यानंतर संशयास्पद कर्ज वितरित केल्याप्रकरणी १५ अधिकारीही अडचणीत येण्याची शक्यता असून १८२ कोटींच्या वसुलीप्रकरणी ४४ जणांची येत्या ०२ एप्रिल २०२५ रोजी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासमोर ही सुनावणी होणार आहे.जिल्हा बँकेतील कर्ज वाटपाच्या चौकशीसाठी तत्कालीन विभागीय सहनिबंधक गौतम बलसाने यांनी कलम चौकशी केली होती. त्या चौकशीत नाशिक सहकारी साखर कारखाना, निफाड सहकारी साखर कारखाना, रेणुका यंत्रमाग औद्योगिक संस्था, आर्मस्ट्राँग साखर कारखाना, तसेच म्हेळुस्के विविध कार्यकारी सेवा सोसायटी आदी संस्थांना झालेल्या कर्जाच्या वाटपात अनियमितता झाल्याचे समोर आले होते. यानंतरच



सहनिबंधकांनी अनियमितता झाल्याचा ठपका २९ आजी–माजी संचालक आणि १५ अधिकाऱ्यांविरोधात १८२ कोटींची वसूली निश्चित केली होती. तसेच या सर्वांना वसुलीच्या नोटिसा दिल्या होत्या. मात्र, त्यावेळी ठपका असणाऱ्यांनी तत्कालीन सहकार मंत्र्यांसमोर आपील करत या प्रकरणावर स्थगिती आणली होती. पण आता सहकार विभागाचे कक्ष अधिकारी सोपान आरोटे यांनी या प्रकरणी पुन्हा एकदा नोटीस काढल्याने खळबळ उडाली आहे. या नोटीसप्रमाणे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह २५ संचालकांना नोटीस (Notice) बजावण्यात आली आहे.

## नगर-पुणे रेल्वे मार्गासाठी टास्क फोर्स हवा

### खा. नीलेश लंके यांचे रेल्वे बोर्डाच्या चेअरमनला साकडे

अहिल्यानगर

अहिल्यानगर : अहिल्यानगर ते पुणे दरम्यान झपाटयाने वाढत असलेल्या औद्योगिकरणाच्या पार्श्वभूमीवर नगर–पुणे दरम्यान रेल्वे सेवा सुरू करण्यासंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी रेल्वे बोर्डाचे चेअरमन सतीशकुमार यांच्याकडे आग्रह धरला. दरम्यान, औद्योगीकरण म्हणजे विकास असे सांगत सतीशकुमार यांनी या मार्गासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही खा. लंके यांना दिली.

चेअरमन सतीशकुमार यांच्यासोबत झालेल्या बैठकीदरम्यान खासदार नीलेश लंके यांनी सुपा औद्योगिक क्षेत्रात आधुनिक रेल्वे स्टेशन तसेच मालधक्का हवा ही मागणी करतानाच सुपा–पारनेर हे औद्योगिक क्षेत्र हे महाराष्ट्रातील एक प्रमुख इंडस्ट्रिलयल हब म्हणून उदयास आलेले आहे. विविध राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय उद्योग या वसाहतीमध्ये असून भविष्यात उद्योगांची



संख्या मोठया प्रमाणावर वाढणार आहे. या गोष्टींचा विचार करून उद्योगांसह कृषि मालवाहू सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील बाबींकडे खा. लंके यांनी सतीशकुमार यांचे लक्ष वेधले.

सुपा–पारनेर औद्योगिक क्षेत्राचा विस्तार हा ऑटोमोबाईल, फार्मा, स्टील, फुड प्रोसेसिंग, तसेच टेक्सटाईल उद्योग व एम एस एम एम आदी क्षेत्रातील उद्योग या वसाहतीमध्ये मोठया प्रमाणावर गुंतवणूक करत असल्याने या वसाहतीचा विस्तार वाढणार असल्याचे खा. लंके यांनी सतीशकुमार यांच्या निदर्शनास आणून दिले.

मालवाहतूकीच्या सुविधेबरोबरच कृषि उत्पादने, प्रवासी उत्पादनासाठी या रेल्वेमार्गाचा विकास होणे महत्वाचे आहे. औद्योगिक क्षेत्रात हजारो कर्मचारी, उद्योजक, व्यापारी दररोज नगर ते पुणे प्रवास करतात. त्यासाठी सुपे येथे रेल्वे प्लॅटफॉर्म, प्रतिक्षालय,पार्किंग व्यवस्था, डिजिटल तिकीट प्रणाली या सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी खा. लंके यांनी यावेळी केली.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसोबत असलेली कनेक्टिव्हिटीचा विचार करता सुपा–पारनेर औद्योगिक क्षेत्र हे पुणे, चाकण, मुंबई, दिल्ली, अहमदाबाद तसेच चेन्नई सारख्या प्रमुख औद्योगिक केंद्रांना जोडले जाऊ शकते. या वसाहतीमधील मोठे उद्योग हे वैश्विक बाजारपेठेत प्रवेश मिळवून आयात व निर्यात करणे सोपे होणार असल्याचेही यावेळी खा. लंके यांनी सांगितले.

## तारकपूरमध्ये एसटी बंद !

### तारकपूर स्थानकात बसेस थांबत नसल्याने प्रवासी संतापले

अहिल्यानगर

नगर शहरातील तारकपूर भागात रस्त्याच्या कामामुळे एसटी बसेस येणे बंद झाले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून या समस्येकडे प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी केली जात आहे. सध्या तारकपूर येथील मुख्य रस्त्याचे काम सुरू असून एका बाजूचे काम पूर्ण झाले आहे, मात्र दुसऱ्या बाजूचे काम अजूनही प्रलंबित आहे. त्यामुळे सकाळी ९ नंतर बसेस येणे थांबवण्यात आले आहे. वाहतूक कोंडीचे कारण देत एसटी महामंडळाकडून हा निर्णय घेतला गेला आहे. मात्र या निर्णयामुळे स्थानिक नागरिक,विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना बस पकडण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत आहे.तारकपूर




बस स्थानकावरून दररोज अनेक प्रवासी कामानिमित्त शहरा बाहेरील गावांमध्ये व इतर शहरांकडे प्रवास करतात. मात्र बससेवा अनिश्चित असल्याने अनेकांना निराश होऊन माळीवाडा किंवा स्वस्तिक चौक पुणे बस स्थान काकडे वळावे लागत आहे.या ठिकाणी बस पकडण्या साठी प्रवाशांची गर्दी होते, परिणामी प्रवास करणे कठीण होते. विशेषतः पुणे, नागपूर, संभाजी नगर, मुंबई या ठिकाणी जाणाऱ्या बसेस तारकपूर स्थान कातन थांबता थेट पुढे जात आहेत. त्यामुळे नागरिकां ना डीएसपी चौकात जाऊन बस पकडण्याची वेळ आली आहे. यामुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दुसरी कडे माळीवाडा बस स्थानका च्या नूतनीकरणा मुळे तेथे जागा कमी पडत असून, हा ताण स्वस्तिक चौकातील पुणे बस स्थानकावर येत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी गर्दी वाढत असून, प्रवाशांची गैरसोय अधिकच तीव्र झाली आहे.या पार्श्वभूमीवर, एसटी महामंडळ प्रशासनाने लवकरात लवकर यावर उपाययोजना करून पूर्वीप्रमाणे तारकपूर बस स्थानकात बसेस नियमित थांबविण्याची व्यवस्था करावी, अशी प्रवाशांची मागणी आहे. आगामी सुट्ट्यांमध्ये प्रवाशांची संख्या वाढणार असल्याने, समस्येचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## कांद्याने रडवलं! - दर घसरले, खर्चही निघणार नाही; शेतकरी संकटात!



अहिल्यानगर

नक्षर तालुका हा कांदा उत्पादनात राज्यात अग्रेसर मानला जातो आणि येथील शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कांदा पिकावर अवलंबून आहे. कांद्याला ङ्गपठारङ्घ अशी नवी ओळख मिळालेल्या या तालुक्यातील शेतकरी सध्या गंभीर संकटात सापडले आहेत.यंदा विक्रमी कांदा उत्पादन झाले असले तरी बाजारात कांद्याचे भाव कोसळल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत कांद्याला ५ ते ६ हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळत होता, परंतु आता हाच कांदा दीड हजार रुपये क्विंटलने विकला जात आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे.या तालुक्यात लाल कांदा, रांगडा कांदा आणि गावरान कांदा मोठ्या प्रमाणात पिकवला जातो. अनेक शेतकऱ्यांनी जिरायती क्षेत्राला सिंचनाखाली आणून कांदा लागवडीला प्राधान्य दिले आहे. चालू वर्षी सुमारे २० हजार हेक्टर क्षेत्रावर रांगडा आणि गावरान कांद्याची लागवड झाली होती.प्रतिकूल हवामान, पाण्याची टंचाई आणि दव यांसारख्या अडचणींवर मात करत शेतकऱ्यां नी कांदा पिकवला. जेऊर पट्टा हा कांदा उत्पादनासाठी राज्यात प्रसिद्ध असला तरी यंदा पाण्याच्या कमतरतेमुळे तिथे उत्पादन घटले आहे.

## भाविकांचा 'प्रसाद' श्वानांसाठी बनला जीवघेणा ?

अहिल्यानगर

शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या कोट्यवधी भाविकांमुळे मंदिर परिसर नेहमीच गजबजलेला असतो. मात्र, उन्हाचा चटका वाढल्याने सध्या भाविकांची संख्या काहीशी कमी झाली आहे आणि या शांततेत मंदिर परिसरातील भटके श्वान निवांतपणे पहुडलेले दिसत आहेत.परंतु, या श्वानांच्या आरोग्याची स्थिती चिंताजनक बनली आहे. भाविकांकडून श्रद्धेपोटी मिळणारे बुंदीचे लाडू, पेढे, बिस्किटे आणि दूध यांसारखा अतिरेकी गोड आहार यामुळे या श्वानांना मधुमेहासारखी व्याधी जडली आहे. याचा परिणाम म्हणून त्यांचे केस गळत आहेत, पोटात जंतू निर्माण होत आहेत आणि ते आजारी पडत आहेत. साईबाबांच्या समाधीवर नतमस्तक होण्यासाठी येणारे भाविक विविध प्रकारे श्रद्धा व्यक्त करतात. काही दानपेटीत दान टाकतात, तर काही अन्नदान करतात. याशिवाय, काही भाविकांचे लक्ष मंदिर परिसरातील भटक्या श्वानांकडे जाते. साईबाबां वरील श्रद्धेपोटी ते या श्वानांना प्रसाद म्हणून गोड पदार्थ खाऊ घालतात.सतत मिळणाऱ्या या भरपेट गोड आहारामुळे मंदिराच्या दीड किलोमीटर परिघातील श्वान धष्टपुष्ट झाले आहेत. त्यांचे वजन वाढले असून, ते सुस्त आणि आळशी दिसत आहेत. दुसरीकडे, दोन किलोमीटर परिघा बाहेरील श्वान मात्र चपळ आणि तरतरीत आहेत, हा विरोधाभास शिर्डीत स्पष्टपणे दिसून येतो.या गोड आहाराचा अतिरेक श्वानांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करत आहे. पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, सतत गोड पदार्थ खाणाऱ्या या श्वानांची प्रतिकारशक्ती क्षीण झाली आहे. ते इतके सुस्त झाले आहेत की, गोड पदार्थां शिवाय दुसरे काही खाण्यासही तयार होत नाहीत.भाविक किलोच्या पटीत गोड पदार्थ त्यांच्या तोंडात भरवत असल्याने त्यांच्यात लठ्ठपणा आणि मधुमेहासारखे आजार वाढले आहेत. यामुळे त्यांचे केस गळणे, पोटात जंतू निर्माण होणे आणि इतर आजार उद्भवत आहेत. काही श्वान तर भाविकांनी पाठीवरून हात



फिरवला तरी हाल चाल करत नाहीत, इतके निष्क्रिय झाले आहेत. शिर्डीतील श्वानांची वाढती संख्या हाही एक चिंतेचा विषय आहे. एकाच वेळी पाच ते सहा पिल्लांना जन्म देणाऱ्या या श्वानांमुळे त्यांची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. काही दिवसांपूर्वी पशुवैद्यकीय विभागाने श्वान पकडून त्यांची नसबंदी केली होती, परंतु मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे ही प्रक्रिया आता थांबली आहे.जे लोक स्वतःहून श्वानांना उपचारासाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडे घेऊन जातात, त्यांच्यावर उपचार होतात. परंतु, भटक्या श्वानांना कोण घेऊन जाणार, हा प्रश्न अनुत्तरित आहे. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सुशील कोळपे यांनी सांगितले की, सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेतल्यास मधुमेह आणि निद्रानाशाने त्रस्त श्वानांवर उपचार शक्य आहेत. भाविकांनी श्वानांना गोड पदार्थ खाऊ घालणे थांबवावे आणि याबाबत जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.निवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. पुरुषोत्तम आबिलडुके यांनीही या समस्येचे गांभीर्य अधोरेखित केले. त्यांच्या मते, भटक्या श्वानांना पकडून उपचार केल्यास ते बरे होऊ शकतात.श्वानांचे आयुष्यमान साधारण १० ते १२ वर्षे असते, परंतु मधुमेहासारख्या आजारांमुळे ते कमी होऊ शकते. गोड पदार्थ हेच या आजारांचे प्रमुख कारण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिर्डीतील या अनोख्या समस्येवर उपाय म्हणून भाविकांमध्ये प्रबोधन आणि श्वानांच्या आरोग्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे बनले आहे.

# विजांच्या कडकडाटासह पाऊस, राज्यात अवकाळीसह गारपीट होणार

अहिल्यानगर



पुणे : गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने बदल होताना दिसत आहेत. मागच्या आठ दिवसांपूर्वी राज्यात उष्णतेने अंगाची लाहीलाही होत होती तर आता वातावरण थंड जाणू लागतंय. हेच नाही तर अनेक ठिकाणी अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आलाय. दोन दिवस राज्यातील अनेक ठिकाणी अवकाळी पावसाचा इशारा आहे. चंद्रपूर आणि लातूरमध्ये तर पावसाने झोडपले आहे. पुढील दोन दिवस कुठेही उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला नाहीये. चंद्रपूरमध्ये सतत उष्णता वाढताना दिसत होती. आता मोठा दिलासा उष्णतेपासून मिळालाय.विदर्भातील अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर आणि यवतमाळ या भागांमध्ये गारपीटीचा इशारा देण्यात आलाय. मराठवाड्यातील नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरसह लातूरमध्येही अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आलाय. या अवकाळी पावसामुळे जरी वातावरण थंड होईल. मात्र, पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. लातूरमध्ये जोरदार अवकाळी पाऊस झाल्याचेही बघायला मिळाले.दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा (३०-४० किमी प्रतितास वेग), हलका ते माध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे, असे हवामान खात्याने म्हटले आहे. मुंबई, पुणे, कोकण, सोलापूरमध्ये सामान्य वातावरण राहिल. कोकणातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसाचा कोणताही फटका याठिकाणी बसणार नाही. मार्च महिन्यात दोन ते तीन वेळा हवामान खात्याकडून उष्णतेच्या लाटेचा इशारा हा देण्यात आला होता. कोकणात उष्णता वाढताना दिसत होती.२५ मार्चपर्यंत वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आलीये. नाशिक आणि खानदेशला देखील अवकाळीचा फटका बसणार नाहीये. बंगालच्या उपसागरातील ९०० मीटर उंचीपर्यंतच्या प्रत्यावर्ती चक्रीय वारे व मध्य प्रदेशाच्या नैऋत्य भागात १५०० मीटर उंचीपर्यंतच्या आवर्ती चक्रीय वारे वाहत आहे. यामुळे राज्यातील वातावरणात मोठा बदल झाल्याचे चित्र बघायला मिळतंय. मार्च महिन्यातच काही शहरांमध्ये ४० अंश सेल्सिअसपर्यंत पारा गेल्याचे चित्र बघायला मिळाले. मात्र, त्यानंतर आता तापमानात मोठी घट झालीये.

# शाळेची बस चालेल, पण रिक्षा आणि व्हॅन 'बंद'! विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी मोठा निर्णय

अहिल्यानगर




शालेय विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षेला प्राधान्य देत उपप्रादेशिक परिवहन विभागाने नवीन नियम लागू केले आहेत. यानुसार, आता फक्त स्कूल बसलाच विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी परवानगी मिळणार आहे, तर रिक्षा आणि स्कूल व्हॅनला नव्याने परवाना दिला जाणार नाही. या निर्णयामुळे शहरातील ८०३ स्कूल बस आणि स्कूल व्हॅनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून, याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व शाळांना देण्यात आले आहेत.या नव्या नियमांत मुलींच्या सुरक्षेला विशेष लक्ष देण्यात आले आहे. स्कूल बसमध्ये आता महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती अनिवार्य करण्यात आली आहे, जेणेकरून मुलींच्या सुरक्षिततेची पूर्ण खबरदारी घेतली जाईल. उपप्रादेशिक परिवहन विभागाने यासंबंधीचे पत्र सर्व शाळांच्या व्यवस्थाप नाला पाठवले आहे. याशिवाय, स्कूल बस किंवा व्हॅनमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी आढळल्यास शाळा व्यवस्थापनाला थेट पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या नियमांमुळे शालेय वाहतुकीत शिस्त आणि सुरक्षितता वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती आणि जिल्हा प्रवासी समन्वय समितीच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत वाहतूक पोलिस आणि उपप्रादेशिक परिवहन विभागाने प्रथमच स्कूल बस आणि व्हॅनमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचा नियम अनिवार्य केला. यापूर्वी अशा प्रकारची सक्ती नव्हती, परंतु विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या वाढत्या चिंतेमुळे हा पाऊल उचलण्यात आला आहे. सर्व शाळांना या नियमांचे पालन करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले असून, याची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्यास सांगण्यात आले आहे.नव्या नियमांनुसार, स्कूल बसमध्ये जास्तीत जास्त १३ विद्यार्थी बसवण्याची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. आरटीओ विभागाने याला परवानगी दिली असली, तरी स्कूल व्हॅनद्वारे विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यासाठी नवीन परवाने जारी केले जाणार नाहीत. विशेष म्हणजे, रिक्षाद्वारे शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयामुळे रिक्षाचालकांमध्ये नाराजी पसरली असली, तरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी हे पाऊल अपरिहार्य असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

# प्रत्येकाने पाणी जपून वापरावे; मनपा आयुक्तांचे आवाहन

## २२ मार्च जागतिक जल दिनानिमित्त संजीवनी कॉलनीत 'जल' जागृती कार्यक्रम

अहिल्यानगर

अहिल्यानगर : संपूर्ण सजीव सृष्टीसाठी पाण्याचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. निसर्गाचे हे अनमोल वरदान सध्या मोफत असले तरी भविष्यात पाण्यासाठी मोठी किंमत मोजावी लागेल अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. पृथ्वीवरील शुद्ध पाण्याची सध्या असलेली उपलब्धता लक्षात घेता प्रत्येकाने पाणी जपून व काटकसरीने वापरणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.

२२ मार्च जागतिक जल दिनाच्या निमित्ताने ग्रीन कॉलनी संजीवनी कॉलनीमध्ये हरिभुमी प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित जलजागृती कार्यक्रमात मार्गदर्शन करताना आयुक्त डांगे बोलत होते. घरगुती गार्डन पाईपला प्रेशर नोझल, जेट जोडल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होऊ शकते, याचे प्रात्यक्षिक हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी यावेळी आयुक्त डांगे यांच्यासमोर करून दाखवले. याचबरोबर हे गार्डन पाईप प्रेशर नोझल, जेट कॉलनीतील सदस्यांना जागतिक जलदिनानिमित्त वितरित करण्यात आले.




यावेळी पाणी बचती संदर्भात मार्गदर्शन करताना आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, नागरिकांनी महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडून उपलब्ध होणारे पाणी पेयजल काटकसरीने वापरावे, वाहने धुतांना, अंगणामध्ये सडा मारतांना होणारा पेयजलाचा अपव्यय टाळावा, नादुरुस्त जलवाहिन्या दुरुस्त करून घेणे, गळके, टीपकणारे नळ दुरुस्त करून घेणे, पिण्यासाठी पेल्यात आवश्यक तेवढेच पाणी घ्यावे, एक-दोन दिवसापूर्वीचे पिण्याचे पाणी टाकून न देता त्याचा इतर वापर करावा, वॉश बेसिनचा नळ गरजेपुरता वापरावा, धुण्याचे पाणी झाडांसाठी वापरण्याचे नियोजन करावे आदी साध्या सोप्या उपाययोजना करून पाण्याचा अपव्यय सहज टाळता येऊ शकतो असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.

यावेळी कॉलनीतील जेष्ठ सदस्य शांतीलाल गुगळे, सुरेश चांडक, विनय बिनायके, सुनील जोशी, यांनी प्रधानमंत्री सूर्य घर योजनेअंतर्गत घराच्या छतावर सोलर पॅनल युनिट बसविण्याचा संकल्प केला. तर सुमित चांडक यांनी घराच्या छतावरील पाण्याचे संवर्धन (रूफ वॉटर हार्वेस्टिंग) करण्यासाठी यंत्रणा बसविण्याचा निर्धार केला. यावेळी प्रशांत मते, चंद्रकांत शिपणकर, अभय ललवाणी, पारस चुडीवाल, सलिम शेख, यश गुगळे, आशिष बळे आदी उपस्थित होते.

# एप्रिलपासून जिवंत सातबारा मोहीम सुरू ! वारस नोंदीसाठी महसूल विभागाची तयारी!

अहिल्यानगर




जामखेड तालुक्यातील महसूल प्रशासनाने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. १ एप्रिल २०२५ पासून जिवंत सात-बारा मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. राज्य सरकारने या मोहिमेसाठी परिपत्रक जारी करून महिनाभराचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला आहे.या मोहिमेचे समन्वय तालुका स्तरावर तहसीलदारांकडे सोपवण्यात आले असून, सात-बारा उताऱ्यांवरील मृत खातेदारांची नावे काढून त्यांच्या वारसांची नोंद अद्ययावत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.या मोहिमेसाठी स्पष्ट कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. १ ते ५ एप्रिल दरम्यान ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) आपल्या कार्य क्षेत्रातील गावांमध्ये चावडी वाचन करणार आहेत. या प्रक्रियेत न्यायप्रविष्ट प्रकरणे वगळून गावनिहाय मृत खातेदारांची यादी तयार केली जाईल.त्यानंतर ६ ते २१ एप्रिल या कालावधीत वारसांनी आपली आवश्यक कागदपत्रे तलाठ्यांकडे सादर करायची आहेत. तलाठ्यांनी स्थानिक पातळीवर चौकशी करून मंडलाधिकाऱ्यांमार्फत वारस ठराव ई-फेरफार प्रणालीत मंजूर करून घ्यावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.ही मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रशासना ला मोठी जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. तलाठ्यांना ई-फेरफार प्रणालीत वारस फेरफार तयार करावे लागतील आणि मंडलाधिकाऱ्यां नी विहित कार्यपद्धतीनुसार निर्णय घेऊन सात-बारा उतारे दुरुस्त करावे लागतील.यामुळे सात-बारावर केवळ जिवंत व्यक्तींचीच नोंद असेल. महिनाभराच्या या कालावधीत हे काम पूर्ण करणे प्रशासनासाठी आव्हानात्मक असणार आहे. मात्र, ही योजना यशस्वी झाल्यास शेतकऱ्यांचा आर्थिक आणि मानसिक त्रास लक्षणीयरीत्या कमी होईल.जिवंत सात-बारा मोहिमेमुळे जमिनीच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता येण्यासोबतच शेतकऱ्यांना कर्ज मिळवणे, मालमत्ता हस्तांतरण करणे आणि इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे सोपे होईल.जामखेडमधील महसूल प्रशासनाने या मोहिमेला गती देण्यासाठी कंबर कसली असून, शेतकऱ्यांनीही या संधीचा लाभ घेऊन आपली कागदपत्रे वेळेत सादर करावीत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# IPL 2025: आजपासून रंगणार IPLचा रणसंग्राम!



अहिल्यानगर

आजपासून इंडियन प्रीमियर लीग म्हणजेच आयपीएलच्या १८ व्या हंगामाला सुरुवात होत आहे. या हंगामातील पहिला सामना गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) यांच्यात खेळला जाईल. आज आयपीएलचा पहिला सामना सुरू होईल, तर अंतिम सामना २५ मे रोजी खेळवला जाईल. जाणून घ्या आयपीएलच्या संपूर्ण स्पर्धेचे वेळापत्रक अनब सविस्तर माहिती. असा रंगणार उद्घाटन सोहळा...आयपीएलच्या पहिल्या सामन्यात गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आमनेसामने येतील. दोन्ही संघांमधील सामना कोलकात्यातील ईडन गार्डन्सवर खेळला जाईल. त्याआधी आयपीएल २०२५ चा धमाकेदार उद्घाटन सोहळा पार पडेल. या उद्घाटन सोहळ्याला बॉलिवूडमधील दिग्गज कलाकारांची गर्दी पाहायला मिळणार आहे. आयपीएलच्या उद्घाटन समारंभात बॉलिवूड अभिनेत्री दिशा पटानीसह गायिका श्रेया घोषाल आणि अरिजीत सिंगसारखे प्रसिद्ध चेहरे झळकणार आहेत. आयपीएलने त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलद्वारे ही माहिती दिली आहे. तसेच आयपीएलच्या उद्घाटन समारंभाला आयसीसी अध्यक्ष जय शाह यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहतील.१० संघ, ७४ सामने...आयपीएल २०२५ मध्ये एकूण ७४ सामने खेळवले जातील. लीग टप्प्यात ७० सामने होतील. सर्व १० संघ लीग टप्प्यात प्रत्येकी १४ सामने खेळतील. आयपीएल २०२५ चे सर्व सामने एकूण १३ शहरांमध्ये खेळवले जातील. आ लखनौ, हैदराबाद, दिल्ली, मुंबई, चेन्नई, अहमदाबाद, विशाखापट्टणम, गुवाहाटी, बेंगळुरू, न्यू चंदीगड, जयपूर, कोलकाता आणि धर्मशाळा याठिकाणी हे सामने होतील. आयपीएल २०२५ चे संपूर्ण वेळापत्रक:

२२ मार्च – कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू२३ मार्च – सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स२३ मार्च – चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध मुंबई इंडियन्स

२४ मार्च – दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध लखनऊ सुपरजायंट्स

२५ मार्च – गुजरात टायटन्स विरुद्ध पंजाब किंग्ज २६ मार्च – राजस्थान रॉयल्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स

हे मासिक मालक,प्रकाशन,संपादक,श्री प्रशांत पोपट शेळके यांनी मुद्रक श्री. सिध्दीनाथ आनंदा मेटे यांच्या,तिरंगा प्रिंटर्स,छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुल,दिल्लीगेट,अहमदनगर अहमदनर -४१४००१ येथे छापून -विद्या कॉलनी,नगर कल्याण रोड,नालेगाव,अहमदनगर ४१४००४(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले (अहमदगनर न्यायकक्षेत)

# भाजपा पदाधिकाऱ्यावर चाकू हल्ला, श्रीरामपूर तालुक्यातील घटना

अहिल्यानगर



तालुक्यातील निपाणी वडगाव येथील भाजपा ओबीसी उपजिल्हाध्यक्ष लखन लोखंडे यांच्यावर चाकूने वार करण्यात आला. पण प्रसंगावधान राखून त्यांनी चाकूचा वार मुठीत धरल्याने बचावले. या हल्ल्यात लोखंडे हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. लखन लोखंडे नेहमीप्रमाणे अशोकनगर रस्त्यावर चालले होते. त्यांना डबल चौकी येथे अज्ञात व्यक्तींनी अडविले. लगेचच एकाने चाकूने लोखंडे यांच्यावर हल्ला चढविला. त्याने पोटाच्या दिशेने चाकूचा वार करण्याचा प्रयत्न केला. पण हे लक्षात येताच लोखंडे यांनी चाकू मुठीत धरून प्रतिकार केला. यावेळी त्यांच्या उजव्या हाताच्या पंजावर चाकू शिरून सहा टाके पडले आहेत. संबंधित हल्लेखोराने पुन्हा त्यांच्या मांडीवर चाकूने वार केले. तर एक वार त्यांच्या पायाच्या पोटरीवर केला. त्यानंतर हल्लेखोर पसार झाले. हल्लेखोर हे व्यसनाधीन व गुन्हेगारी पार्श्व भूमीचे असल्याने नागरिका कडून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याप्रकरणी काल रात्री उशिरापर्यंत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला नव्हता. अन्यथा नागरिकांचा रोष निर्माण होण्याची शक्यता अशोकनगर हे लोक संख्येने तालुक्याच्या अग्रणी असलेले गाव आहे. परंतु या गावामध्ये कायदा सुव्यवस्था अनेक वर्षापासून धोक्यात आलेली आहे. यामुळे निपाणी वडगाव मधील सर्वसामान्य नागरिक भितीच्या छायेखाली वावरत आहेत. यासंदर्भात पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. अन्यथा यासंदर्भात नागरिकांमध्ये मोठा रोष निर्माण होण्याची शक्यता आहे.

# शिवरायांच्या आग्र्यातील स्मारकाचा जीआर निघाला



अहिल्यानगर राज्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची घोषणा शिवजयंती दिनी केली होती. अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यातही आग्र्यातील भव्य स्मारकाची तरतूद करण्यात आल्याचे दिसून आले. आता, आग्र्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबाबत महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळराजे शंभुराजे यांची आग्र्यातून सुटका आणि महाराजांच्या पराक्रमाच्या गौरवगाथेचे स्मरण पुढील पिढ्यांसाठी करून देण्यासाठी हे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

आता, या स्मारकाच्या उभारणीसाठी कार्यान्वयीन व निधीची जबाबदारी राज्याच्या पर्यटन विभागाकडे देण्यात आली असून याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे भव्य स्मारकाच्या उभारणीस येत्या काळात गती लाभणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यातील ज्या ठिकाणी कैद राहिलेले ती जागा महाराष्ट्र सरकार उत्तर प्रदेश सरकारकडून अधिग्रहित करणार आहे. या जागेवर शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारले जाणार असून आग्र्यातील शिवरायांची गाथा सांगणारे संग्रहालयही याठिकाणी उभारण्यात येणार आहे. राज्य सरकारच्या पर्यटन विभागाकडून स्मारकासाठी आर्थिक तरतूद केली जाणार आहे.

स्मारक उभारणीसाठी पर्यटन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली इतिहास तज्ज्ञ तसेच जाणकार, तज्ज्ञांची समिती स्वतंत्रपणे स्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी निधी उपलब्धता, जमीन अधिग्रहण व अनुषंगिक बाबींकरिता पर्यटन विभागाला जबाबदारी देण्यात आली आहे. या विभागांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहणार आहे.

आग्रा येथील ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, ती जागा-वास्तू महाराष्ट्र शासन या प्रकल्पात अधिग्रहीत करणार आहे. याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक निर्माण करण्यात येणार आहे. या शौर्य स्मारकामध्ये महाराजांचा जाज्वल्य इतिहास मांडला जाणार आहे. त्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे उपक्रम संग्रहालय, दृकश्राव्य कार्यक्रम, माहितीपट आदी राबविण्यात येणार आहेत.

# नागपूर दंगलीची न्यायालयीन चौकशी व्हावी

## नैतिक जबाबदारी स्वीकारुन राज्याच्या गृहमंत्र्यांनी राजीनामा देण्याची भाकपची मागणी

अहिल्यानगर



अहिल्यानगर : नगर (प्रतिनिधी)- नागपूर येथे झालेली दंगलीची घटना सुनियोजित कटाचा भाग असून, राज्याची कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचे हे द्योतक आहे. त्यामुळे याप्रकरणी दोषी असलेल्यांवर आणि सत्ताधारी पक्षाच्या वाचाळवीर नेत्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच नैतिक जबाबदारी स्वीकारुन राज्याच्या गृहमंत्र्यांनी राजीनामा देण्याची मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे

महाराष्ट्राची पुरोगामी परंपरा कारस्थान रचून, तसेच बेताल पुसून टाकण्यासाठी राज्यभरात वक्तव्ये करून धार्मिक ध्रुवीकरण महापुरुषांच्या बदनामीचे साधण्याचा कुटील डाव देशविघातक प्रतिगामी शक्तींकडून सुरु आहे.



मुख्य म्हणजे अशा देशविघातकप्रतिगामी शक्तींना राज्यातील सत्ताधारी भाजपा महायुती सरकारचे उघड उघड पाठबळ मिळत असल्यामुळे राज्यात धर्मांध शक्तींनी मोठा उच्छाद मांडला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यभर वाद उकरून काढण्यात येत आहेत. याचवेळी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांच्याबद्दल बदनामीकारक वक्तव्ये केली जात आहेत, त्यांच्यावर मात्र काहीच कारवाई केली जात नाही. भारतीय राज्यघटनेची शपथ घेऊन सत्तेवर आलेले सत्ताधारी पक्षाचे आमदार व मंत्री बेताल वक्तव्ये करून आणि चुकीच्या इतिहासाची मांडणी करून तरुणांना भडकवण्याचा प्रयत्न करत आहे. यामुळे दोन समाजात धार्मिक तेढ निर्माण होऊन, राज्यात ठिकठिकाणी दंगलसदृश दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याचाच विस्फोट होऊन नागपूर येथे झालेल्या आंदोलनाच्या घटनेचे रुपांतर पुढे दंगलीत होऊन त्यात पोलिसांसह अनेकजण जखमी झाले आहेत. रमजानचा महिना सुरू असताना आणि औरंगजेबाच्या कबरी वरून राज्यभर तनावाची परिस्थिती असताना नागपूर मधे विश्व हिंदू परिषद व बजरंग दल यांना संवेदनशील परिस्थिती असताना एकत्र येण्याची परवानगी देण्यात आली, त्यानंतरच वादाला सुरुवात झाली अशी माहिती आहे. पोलिसांनी दंगल झाल्यावर जी तत्परता दाखवली ती अगोदरच दाखवली असती तर पुढील घटना घडली नसती, असे भारतीय कम्युनिस्ट पक्षांसह डाव्या पक्षांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

वास्तविक नागपूर शहर शांत व धार्मिक सलोखा राखण्यासाठी प्रसिद्ध आहे. यापूर्वी अपवाद वगळता यथे धार्मिक अथवा जातीय दंगल झालेली नाही. पण १७ मार्च रोजी झालेल्या दंगलीमुळे याला गालबोट लागले आहे. सत्ताधारी पक्षाच्या वाचाळवीरांना वेळीच रोखले असते, तर राज्यात अशी अशांतता निर्माण झाली नसती. त्यामुळे राज्य शासनाने आतातरी तत्परता दाखवत, धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या अशा व्यक्ती व संघटनांवर तातडीने कडक कारवाई करावी अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केली आहे.

> राज्यात सद्यस्थितीला श्रमिक, कष्टकरी, शेतकरी व गोरगरीब, सर्वसामान्य जनतेचे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. याकडे जनतेचे दुर्लक्ष व्हावे, यासाठीच धर्मांध शक्तींकडून धार्मिक ध्रुवीकरणाचा हा अजेंडा पुढे रेटला जात आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्रातील जनतेने कोणत्याही अफवांना आणि धार्मिक विद्वेषाला बळी न पडता, संयमी व विवेकी भूमिका ठेवून आपापसातील सौदार्य वाढवावे, असे आवाहन भारतीय कम्युनिस्ट पक्ष करत आहे. **- कॉम्रेड सुभाष लांडे**
> - राज्य सेक्रेटरी, भारतीय कम्युनिस्ट पक्ष

# नगररचना विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची आयुक्तांकडून कानउघडणी

## छाननी झाल्यावरच ऑनलाईन फाईल दाखल करून घ्याव्यात, आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या सूचना

अहिल्यानगर



**अहिल्यानगर** : बांधकाम परवानगीसह सर्व प्रकरणांची ऑनलाईन फाईल दाखल होण्यापूर्वी त्याची छाननी करून घ्यावी. ऑनलाईन फाईल दाखल होण्यापूर्वीच त्रुटी दूर करून घेतल्यास पोर्टलवर फाईल प्रलंबित राहणार नाही, अशा सक्त सूचना आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी नगररचना विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. तसेच, प्रलंबित असलेल्या प्रकरणाबाबत जाब विचारून त्यांची कानउघडणीही त्यांनी केली. नागरिकांनीही ऑनलाईन फाईल दाखल करून घेण्यापूर्वी त्याची छाननी करून घ्यावी, जेणेकरून त्रुटी विरहीत फाईल दाखल होईल व ती प्रलंबित राहणार नाही, असेही आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

आमदार संग्राम जगताप यांनी विधानसभेत नगररचना विभागाच्या कारभारविरोधात तक्रार केली होती. त्याची दखल घेत आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी गुरुवारी तत्काळ नगररचना विभागाच्या कामकाजाचा व प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला. पोर्टलवर शंभरहून अधिक विविध प्रकारची प्रकरणे प्रलंबित दिसत आहेत. त्यातील बहुतांशी प्रकरणे ऑफलाईन मंजूर झाले आहेत. तसेच, काही प्रकरणांमध्ये त्रुटी काढण्यात आल्या आहेत. त्याची पूर्तता संबंधितांनी केलेली नाही. त्यामुळे ही प्रकरणे प्रलंबित आहेत. सद्यस्थितीत ४० ते ५० प्रकरणे प्रलंबित असून, त्याच्या मंजुरीची प्रक्रिया सुरू असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले. पोर्टलवर प्रलंबित दिसणाऱ्या प्रकरणांची तपासणी करावी. जी ऑफलाईन मंजूर आहेत, ती प्रकरणे पोर्टलवर प्रलंबित दिसणार नाहीत, याची खातरजमा करावी. त्रुटींची पूर्तता संबंधितांकडून होत नसेल तर ती प्रकरणे मुदत संपल्यावर नामंजूर करावीत. कोणत्याही परिस्थितीत मुदतीतच परवानग्या दिल्या जातील, याची दक्षता घ्यावी. त्यासाठी ऑफलाईन छाननी करून मगच ते ऑनलाईन दाखल होतील, याची दक्षता घ्यावी. प्रकरणे प्रलंबित दिसल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.

# छत्रपतीचा अवमान करणाऱ्या भाजप नेत्याची खासदारकी रद्द करा - संभाजी माळवदे

अहिल्यानगर




**नेवासा** : लोकसभेमध्ये भाजप नेत्याकडून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान केल्याप्रकरणी आज काँग्रेससह बहुजन मुक्ती पक्ष, बसपा, व इतर संघटनाकडून निषेध करण्यात आला. सविस्तर वृत्त असे की, देशात सत्ताधारी भाजपा पार्टीतील मोठ्या फळीतल्या नेत्याकडून रोज काही ना काही चिथावनीखोर वक्तव्य करून वादंग निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यात महान पुरुषांना देखील ओढवून घेण्याचे काम सोयीस्कररित्या हे नेते करताना दिसतात. सध्या दिल्लीत लोकसभेचे अधिवेशन चालू आहे या अधिवेशनात भाजपचे प्रदीप पुरोहित या खासदाराने पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागच्या जन्मी छत्रपती शिवाजींचा अवतार होते. मोदी हे शिवाजी महाराजच आहे असे वक्तव्य केले. पुरोहित यांनी केलेल्या वक्तव्याचे पडसाद महाराष्ट्रभर पसरले असून ठीक ठिकाणी याचा निषेधही करण्यात आला. आज नेवासा तहसील कार्यालय येथे काँग्रेससह, बहुजन मुक्ती पक्ष, बसपा, व इतर संघटना कडून छत्रपतीचा अवमान केल्यामुळे प्रदीप पुरोहित व भाजपा सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी पुरोहित व भाजपा सरकार विरोधात निषेधाच्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड हिंदुस्थानचे आराध्या दैवत असून त्यांचा अवमान आम्ही सहन करणार नाही ज्या खासदाराने असे वक्तव्य केले त्याची खासदारकी रद्द केलीच पाहिजे अशी मागणी केली. शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी देशातील अनेक प्रश्न वाढती गुन्हेगारी, महिलांवरचे अत्याचार, महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, बुडती अर्थव्यवस्था या प्रश्नापासून पळ काढण्यासाठी जाणून बुजून छत्रपतीं सारख्या महान पुरुषावर अवमान कारक वक्तव्य करून लोकांचे लक्ष भरकटविन्याचे काम भाजपा नेते करत आहे.तर गणपत मोरे यांनी छत्रपती हे अठरापगड जातींचे राजे होते. आपल्या वरिष्ठ नेत्याला खुश करण्यासाठी भाजपा नेते छत्रपतीविषयी रोज काही ना काही अवमानकारक वक्तव्य करत असतात. हा महाराजाचा अवमान नसून पूर्ण महाराष्ट्राचा अवमान आहे. जाती जातीमध्ये, धर्मधर्मामध्ये तिरस्काराचे विष कालवण्याचे काम भाजप नेते करत आहे असे स्पष्ट केले. यावेळी नेवासा तहसीलदार संजय बिरादार यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले. निवेदनावेळी काँग्रेस अध्यक्ष आण्णासाहेब पटारे,सतीश तऱ्हाळ, गुलाब पठाण,बहुजन मुक्तीचे राम मगरे, मिन्हाज शेख, बसपाचे अध्यक्ष विकास चव्हाण, युवा नेते हरीश चक्रनारायण, सामाजिक कार्यकर्ते संजय नारळे आदीसह आंदोलक उपस्थित होते.

# कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरोधत लढा उभारणार : रामेश्वर ढाकणे

## ऑल इंडिया पोस्टल एम्लॉईज युनियन अहिल्यानगर विभागाच्या अध्यक्षपदी ढाकणे तर सेक्रेटरीपदी कदम यांची नियुक्ती

अहिल्यानगर

अहिल्यानगर : ऑल इंडिया पोस्टल एम्लॉईज युनियन ग्रुप सी व पोस्टमन एमटीएस युनियनचे संयुक्त द्वैवार्षिक अधिवेशन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी अहिल्यानगर विभागाच्या ग्रुप सी च्या अध्यक्षपदी रामेश्वर ढाकणे, सेक्रेटरीपदी प्रमोद कदम यांची तर पोस्टमन एमटीएसच्या अध्यक्षपदी सलीम शेख व सेक्रेटरीपदी गणेश केसकर यांची एकमताने निवड करण्यात आली.

याप्रसंगी ऑल इंडिया पोस्टल एम्लॉईज युनियन महाराष्ट्र सर्कल ग्रुप सी चे सेक्रेटरी सुरेंद्र पालव, पोस्टमन एमटीएस युनियनचे जनरल सेक्रेटरी राजेश सारंग, मुंबई पोस्टल सोसायटीचे मानद सचिव महेश सावंत, गुरुदत्त आळवे, चंद्रशेखर शिंदे, बाळकृष्ण चाळके, सदानंद राणे, राजू तुपे, संजय हिंदुराव, शंकर म्हस्के, रघुनाथ ससाणे, दत्तात्रय जासूद यांच्यासह अहिल्यानगर डिव्हीजन विविध पदाधिकारी उपस्थित होते.

सुरेंद्र पालव म्हणाले की, महिला कर्मचारी यांच्या सुरेक्षेसाठी मुलभुत सोयी सुविधा असलेल्या ठिकाणी नियुक्ती मिळावी, संगणक व मोबाईलवर काम करताना होणाऱ्या डोळ्यांच्या विकारासाठी विशेष भत्ता देण्यात यावा, आठव्या वेतन आयोगामध्ये केंद्रीय कर्मचाऱ्यांना मोठा आर्थिक लाभ मिळावा यासाठी सरकारकडे मागणी करण्यात येणार आहे.



ऑल इंडिया पोस्टल एम्लॉईज युनियन अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर बोलताना रामेश्वर ढाकणे म्हणाले की, कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासाठी संघर्षाची वेळ येणार नाही, अशा पध्दतीने काम करण्याचे धोरण आखले जाणार आहे. तसेच कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरोधत लढा उभारणार आहे. यावेळी ऑल इंडिया पोस्टल एम्लॉईज युनियन महिला कमिटीच्या चेअरमनपदी रुपाली निसळ, ज्योती कांबळे, एसएटीओबीसी कमिटीच्या चेअरमनपदी विजय चाबुकस्वार, विजय जाधव व अन्य पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्लकुमार काळे यांनी केले. आभार अमीत कोरडे यांनी मानले. यावेळी अहिल्यानगर विभागातील कर्मचारी सुनील कुलकर्णी, निसार शेख, महेश तामटे, किशोर नेमाने, सलीम शेख, शिवाजी कांबळे, स्वप्ना चिलवर, अर्चना दहिंडे, बळी जायभाय, सुनील भागवत, सतीश येवले, दिपक जसवाणी, अंबादास सुद्रीक, रुषिकेश कार्ले, प्रदीप बनकर, शरद नवसुपे, अरविंद वालझाडे, विजय चाबुकस्वार, संदीप मिसाळ, सुखदेव पालवे, जय मडावी, कविश्वेर ताकपेरे, अविनाश आढाव, सुनील जाधव, देवेंद्र शिंदे, आनंद भोंडवे, कैलास भुजबळ, पदमराज पडलवार, शंकर कडभणे, दिलीप खरात, भिवसेन खरात, अमोल बोरुडे, गणेश कोल्हे, अशोक घुले, बलराम दाते, विनायक सोनावळे, सुभाष चव्हाण, अश्विनी फुलकर, शुभांगी मांडगे, सविता आवारे, शुभांगी सस्कर, अक्षरा दरवडे, रोहिणी राऊत, अर्चना रणखाम आदी कर्मचारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बँकांनी संवेदनशीलतेने कर्ज प्रकरणे मंजूर करावीत : जिल्हाधिकारी

अहिल्यानगर

अहिल्यानगर : शासनमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना तसेच शेतकऱ्यांना कर्ज वाटपामध्ये प्राधान्य देत बँकांनी संवेदनशीलतेने अधिकाधीक कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी रिझर्व बँकेचे प्रतिनिधी राजेंद्र कनीशेट्टी, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी आशिष नवले, नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक विक्रम पठारे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अतुल दवंगे, उपजिल्हा निबंधक गणेश पुरी, पशुसंवर्धन उपायुक्त सुनील तुंभारे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, शासकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या कर्जांची प्रकरणे बँकांकडे संबंधित विभागामार्फत पाठविण्यात येतात. अशी कर्ज प्रकरणे मंजूर करण्याच्या प्रक्रीयेत विलंब लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. बँकांमध्ये प्रलंबित असलेले अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावेत.

सुटीच्या दिवशी बँकांमध्ये कर्ज प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करत अर्जांची असलेली प्रलंबितता संपविण्यात यावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या. लाभार्थ्यांनी कर्जासाठी सादर केलेले अर्ज किरकोळ असलेल्या त्रुटी अभावी नाकारू नयेत. अर्जामध्ये त्रुटी नसतानाही अर्ज नाकारल्यास त्याची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

जिल्ह्यात बचतगटांचे काम अत्यंत चांगले आहे. बचतगटातील महिलांना विविध उद्योगाच्या उभारणीसाठी मागणीनुसार कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे. ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेमार्फत बचगटातील महिलांना कर्ज प्रकरणे कशा पद्धतीने सादर करावीत याबाबतचे प्रशिक्षणाचे आयोजन करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केल्या.

यावेळी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, प्रधानमंत्री मुद्रा योजना, सीएमईजीपी, पीएमईजीपी, एमएसआरएलएम, पी. एम विश्वकर्मा यासह ईतर विभागामार्फत कर्ज पुरवठ्यासाठी दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. तसेच यावेळी जिल्हा पत आराखडा २०२५ चे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. बैठकीस जिल्ह्यातील विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# पोलिसाकडून तरुणीवर बलात्कार

अहिल्यानगर

श्रीरामपूर शहरातील रेल्वे स्थानकाजवळ एका महिलेची फसवणूक करून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात एका रेल्वे पोलिस कर्मचाऱ्या विरोधात गुन्हा दाखल फरण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, शुक्रवारी (ता. १४) पीडित महिला आपल्या मैत्रिणीला भेटण्यासाठी श्रीरामपूर रेल्वेस्थानकावर आली होती.मात्र, तेथे एका गणवेशातील व्यक्तीने तिला गाठले आणि आपण रेल्वे पोलिस व सेवानिवृत्त सैनिक असल्याचे स्यांगितले. त्याने महिलेची ओळख वाढवून श्रीरामपूरमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले. मंगळवारी (ता. १८) आरोपीने महिलेचा विश्वास संपादन करून तिला पुन्हा श्रीरामपूर येथे बोलावले. त्यानंतर तिला काही ठिकाणी नेले.त्यानंतर एका इमारतीच्या तळघरात नेले. तेथे बंद खोलीत तिच्यावर शारीरिक अत्याचार केला, तसेच मी पोलिस आहे, कुणाला



काही सांगितले, तर तुला सोडणार नाही, अशी धमकी दिली. त्यानंतर आरोपीने दुपारी सव्वातीन वाजेच्या सुमारास श्रीरामपूर बसस्थानकातून छत्रपती संभाजीनगरच्या बसमध्ये बसवून दिले पीडित महिला छत्रपती संभाजीनगर येथे न जाता टाकळीभान येथे बसमधून खाली उतरली. पुन्हा श्रीरामपूर येथे परत येत तिने मैत्रिणींना घडलेली घटना सांगितली. त्यानंतर शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून रेल्वे पोलिस ज्ञानदेव आढाव (पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सह्याद्री देवराई वनप्रकल्प आगीच्या भक्ष्यस्थानी ;



अहिल्यानगर

**बीड :** तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर 2017 साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि सेने पटकथा लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या पहिले जागतिक संमेलन जागतिक वृक्ष संमेलन भरलेल्या सह्याद्री देवराई वन प्रकल्पाकडे जिल्हा प्रशासन व वनविभागाच्या दुर्लक्षामुळे घरघर लागली असुन वाळवंट होण्याच्या स्थितीत असुन पाण्याअभावी झाडे वाळली आहेत. याची दखल घेत डॉ . प्रदीप शेळके आणि त्यांचे सहकारी वृक्षप्रेमींनी टँकरद्वारे झाडांसाठी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करत जागतिक वन दिनाच्या निमित्ताने स वनप्रकल्प वाचवण्यासाठी सहकार्य करावे अशी हाक दिली आहे. दुसरीकडे काल रात्री लागलेल्या आगीत पुन्हा झाडांची हानी झाली आहे. सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा यासाठी पर्यावरण मंत्री मुंडे यांनी डोकेवाडी साठवण तलावातुन पाइपलाइन करून कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# आधी प्रेमविवाह नंतर भांडणे ! नवऱ्याने मित्रांच्या सोबतीने केले बायकोला किडनॅप अखेर शिर्डीतून सुटका, धक्कादायक थरार.

अहिल्यानगर

प्रेम होणं किंवा प्रेमविवाह करणं हे आता समाजाचा एक भाग बनले आहे. आता प्रेमविवाह किंवा प्रेम या गोष्टींकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले जाते. बऱ्याचदा ज्या व्यक्तीवर प्रेम केलं, त्याच व्यक्तीशी लग्न व्हावं यासाठी तरुण-तरुणी जीवाचं रान करतात. परंतु हे प्रेमविवाह सर्वांचेच शेवटपर्यंत टिकतात असे नाही.अनेक प्रेमवीरांचे संसार अर्ध्यात संपलेले आहेत. दरम्यान आता एक प्रेमविवाह केलेल्या जोडप्याचा वेगळाच थरार समोर आलाय. हे जोडपं सिन्नर तालुक्यातल आहे. प्रेमविवाह झाल्यानंतर पत्नी माहेरी आली आणि त्यानंतर तिचे मित्रांच्या मदतीने नवनरानेच किडनॅपिंग केल्याचे वास्तव समोर आले आहेया लव्हमॅरेज केलेल्या नवरा बायकोत भांडणे झाले होते. ती रागाच्या भरात माहेरी आली. ती आपल्या आईसोबत रस्त्याने कुठेतरी चाललेली होती. हि वेळ साधत तिच्या नवऱ्याने एका कारमध्ये तेथे एंट्री घेतली.



त्यानंतर बळजबरीने तिला कारमध्ये बसवत तिला पळवून नेले. धक्कादायक म्हणजे या अपहरण नाट्यात त्या महिलेच्या नवऱ्याच्या मित्रांनीही मदत केली. ज्या महिलेचे किडनॅपिंग केले गेले ती १९ वर्षांची आहेतिला ज्यावेळी कारमधून तिचे अपहरण झाले तेव्हा तिची आई अर्थात पतीचीही सासू तेथे तिच्यासोबाबत होती. तिने त्याला खूप थांबवलं, विरोधही केला परंतु सदर महिलेचा नवरा प्रचंड रागात होता त्याने आईलाही अर्थात सासूलाही यावेळी मारहाण केली.१९ मार्च रोजी दुपारी सिन्नर-शिर्डी रस्त्यावरील पांगरी बसस्थानकाजवळ हा प्रकार घडला.या अपहरणाचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. हे अपहरण झाल्यानंतर पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवली. त्यानंतर अपहरण झालेल्या महिलेची शिर्डी बसस्थानक परिसरातून सुटका केली. तसेच या महिलेच्या पतीला अटक केली. सध्या पतीवर सिन्नरच्या वावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. अपहरणात मदत करणाऱ्या आरोपी पतीच्या मित्रांचाही पोलीस शोध घेत आहेत. मात्र सध्या आरोपी पतीचे सर्व साथीदार फरार आहेत.

# अहिल्यानगरमध्ये पुन्हा एक मोठा अधिकारी लाच घेताना जाळ्यात !

अहिल्यानगर

अहिल्यानगरमध्ये यापूर्वीही अनेक अधिकारी लाचेच्या जाळ्यात सापडले आहेत. त्यांच्यावर




कारवाईही झाली. परंतु लाच घेण्याचे प्रमाण मात्र कमी होत नाही. आता पुन्हा एक अधिकारी लाचेच्या जाळ्यात सापडला आहे. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत भुजलाशयीन पिंजरा मत्स्यसंवर्धन हा प्रकल्पासाठीचे शासकीय अनुदान मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी तक्रारदारास ४० हजारांची लाच मागून त्याचा पहिला हप्ता म्हणून २० हजार रुपये स्वीकारताना मत्स्य व्यवसाय (तांत्रिक) सहाय्यक आयुक्तास नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे.रमेशकुमार जगन्नाथ धडील (वय ५७, रा. ॲक्वा लाईन रेसिडेन्सी, धोंगडे नगर, नाशिक रोड, नाशिक) असे आरोपी लोकसेवकाचे नाव आहे. वरवंडी, ता. राहुरी येथील एका कार्यक्रमात २० मार्च रोजी ही कारवाई करण्यात आली आहे.यातील तक्रारदार यांची पत्नी व बहीण यांच्या नावे प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजने अंतर्गत भुजलाशयीन पिंजरा मत्स्यसंवर्धन हा प्रकल्प मंजूर झाला आहे. शासनाच्या अटी व शर्ती प्रमाणे प्रकल्पाचे कामकाज पूर्ण झालेले आहे. तक्रारदार यांची पत्नी यांच्या नावे असलेल्या प्रकल्पास शासनाकडून आतापर्यंत ३ लाख ८८ हजार ८०० रुपये अनुदान प्राप्त झाले आहे. तसेच तक्रारदार यांची बहीण यांचे नावे असलेल्या प्रकल्पास शासना कडून २९ लाख १६ हजार रुपये अनुदान प्राप्त झाले आहे.दोन्ही प्रकल्पांचे उर्वरित अनुदान शासनाकडून येणे बाकी आहे. दोन्ही प्रकल्पांचे उर्वरित अनुदान मिळण्याकरिता प्रस्ताव शासनास पाठविण्याकरता आरोपी लोकसेवक रमेशकुमार जगन्नाथ धडील, (सहाय्यक आयुक्त, वर्ग-१,मत्स्य व्यवसाय (तांत्रिक), अहिल्यानगर) यांनी ४० हजार रुपये लाचेची मागणी करत असले बाबतची तक्रार २० मार्च रोजी नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाली होती. त्यानुसार लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक रमेशकुमार धडील यांनी तक्रारदार यांच्या दोन्ही प्रकल्पांचे उर्वरित अनुदान मिळण्याकरिता प्रस्ताव शासनास पाठविण्याकरता तक्रारदार यांच्याकडे पंचा समक्ष ३० हजार रुपये लाचेची मागणी केली. २० मार्च रोजी वरवंडी, ता. राहुरी येथील गोरक्षनाथ आडसुरे यांचे कार्यक्रमाच्या ठिकाणी सापळा आयोजित केला असता तक्रारदार यांच्याकडून आरोपी लोकसेवक रमेशकुमार धडील यांनी पंचा समक्ष तक्रारदार यांच्याकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणून २० हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सदर बाबत आरोपी लोकसेवक धडील यांचेविरुद्ध राहुरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक अजित त्रिपुटे याचया मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार संतोष शिंदे, रविंद्र निमसे, बाबासाहेब कराड, चंद्रकांत काळे, विजय गंगुल, चालक पो.हे.कॉ. दशरथ लाड यांच्या पथकाने केली. त्यांना पोलीस निरीक्षक राजू आल्हाट, पोलीस अंमलदार उमेश मोरे, गजानन गायकवाड, सचिन सुद्रुक, चालक पो.हे.कॉ. हारुण शेख यांनी सहाय्य केले.

# शिर्डी : साई संस्थान खरेदी वरून पुन्हा एकदा चर्चेत !

अहिल्यानगर

साई संस्थानच्या कापड खरेदी प्रक्रियेवर मोठा वाद निर्माण झाला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते संजय काळे यांनी या प्रकरणात अनियमितता असल्याचा आरोप करत निविदा प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांच्या मते, एका कंपनीने एकाच आडनावाच्या तीन पुरवठा दारांना हमीपत्रे दिली असूनही संस्थानने त्यांना पात्र ठरवले. मात्र, संस्थानने हे आरोप फेटाळत योग्य पारदर्शकतेसाठी निविदा प्रक्रिया रद्द केल्याचा दावा केला आहे.संस्थानच्या कर्मचाऱ्यांसाठी गणवेशासाठी कापड खरेदी आणि शिलाई करण्यासाठी शासकीय दरानुसार खर्च करण्यास व्यवस्थापनाने मान्यता दिली होती. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, कापड खरेदीसाठी ४३.३७ लाख रुपये आणि शिलाईसाठी ९.१९ लाख रुपये खर्चास २१ जून २०२४ रोजी मंजुरी देण्यात आली. त्यानंतर, कापडाचा रंग आणि गुणवत्ता निश्चित करून संस्थानने अधिकृत संकेतस्थळावर निविदा प्रसिद्ध केली.या निविदेसाठी नाशिकमधील एकाच आडनावाच्या तीन व्यक्तींनी अर्ज सादर केला. संस्थानच्या नियमानुसार, निविदाधारक हा अधिकृत विक्रेता किंवा डीलर असणे आवश्यक आहे. मात्र, एका कंपनीने तीन पुरवठादारांना एकाच वेळी हमीपत्रे दिली, जे प्रक्रियेसाठी संशयास्पद ठरले. तिन्ही पुरवठादार नाशिकमधील असून त्यांचे आडनाव एकच आहे, तसेच ते परस्पर नातेवाईक असल्याचा आरोप करण्यात आला. संस्थानच्या खरेदी समितीने ही बाब दुर्लक्षित करत आर्थिक बोली प्रक्रिया (फायनान्शियल बिड) सुरू



ठेवली आणि सर्वांत कमी दर देणाऱ्या पुरवठादाराची निवड केली. तथापि, संजय काळे यांनी ४ जानेवारी २०२५ रोजी तक्रार केल्यानंतर या प्रक्रियेची चौकशी करण्यात आली. चौकशीत तीनही पुरवठादार एकाच मालकीच्या असल्याचे आणि त्यांचे दर जवळपास समान असल्याचे निदर्शनास आले.

यामुळे संपूर्ण निविदा प्रक्रियेवर संशय निर्माण झाला. संस्थानच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणातील आरोप फेटाळले असून, निविदा प्रक्रिया पारदर्शक होती असा दावा केला आहे. साई संस्थानचे सीईओ गोरक्ष गाडीलकर यांनी स्पष्ट केले की, तिन्ही पुरवठादार एकाच कुटुंबातील असले तरी त्यांनी दिलेले दर बाजारभावापेक्षा कमी होते. मात्र, एकाच कंपनीला संधी देण्या ऐवजी इतर नामांकित कंपन्यांनाही संधी मिळावी, या हेतूने संस्थानने निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या मते, यात कोणताही घोटाळा झालेला नाही आणि संस्थानच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.या संपूर्ण प्रकरणावर दोन मतप्रवाह आहेत. एका बाजूला माहिती अधिकार कार्य कर्त्यांचा दावा आहे की संस्थान मध्ये निविदा प्रक्रियेत अनियमितता झाली आहे, तर दुसरीकडे संस्थानने पारदर्शक व्यवहार सुनिश्चित करण्यासाठी निविदा रद्द केल्याचे सांगितले आहे. या वादामुळे संस्थानच्या खरेदी प्रक्रियेवर संशयाचे वातावरण तयार झाले आहे. पुढील तपासात या निर्णयामागील नेमकी कारणे आणि यामध्ये कुठलाही गैरव्यवहार झाला आहे की नाही, हे स्पष्टहोईल.